# कार्यालय - जिल्हा उद्योग केंद्र, यवतमाळ

उद्योग भवन , दारव्हा रोड, यवतमाळ. कार्यालय दुरध्वनी क्रंमाक (०७२३२) २४४०२२ फॅक्स न. २४४०२२

---

## पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम

केंद्र शासनाने पंतप्रधान रोजगार निर्मीती कार्यक्रम ही योजना सन २००८-०९ पासून रोजगार निर्मीती करीता जाहीर केलेली आहे. या योजनेचा मुख्य उद्देश ग्रामीण व शहरी भागात रोजगार निर्मीती करणे हा आहे. शहरी व ग्रामिण भागात ही योजना जिल्हा उद्योग केंद्रामार्फत राबविण्यात येत आहे. तसेच ग्रामिण भागात खादी ग्रामोद्योग आयोग/खादी ग्रामोद्योग मंडळामार्फत ही योजना राबविण्यात येत आहे.

**<u>योजनेची ठळक वैशिष्टये</u> :-**

(१) उद्योगाकरीता प्रकल्पाची मर्यादा रु. २५ लक्ष असून सेवाउद्योग प्रकल्पाची मर्यादा रु.१० लक्ष आहे. (२) रु. १० लक्ष पेक्षा जास्त गुंतवणूक असलेल्या उद्योग घटकाकरीता तसेच रु. ५ लक्ष पेक्षा जास्त गुंतवणूक असलेल्या सेवा उद्योग कमीत कमी ८ वा वर्ग पास असणे आवश्यक आहे. (३) अर्जदाराचे वय १८ वर्षापेक्षा जास्त असावे. (४) पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत कर्ज प्रकरणाकरीता उत्पन्नाची अट नाही. (५) ही योजना फक्त नवीन उद्योग / सेवा उद्योग सुरु करणार असलेल्या व्यक्तीनाच लागू आहे. (६) स्वयं सहायता गट / दारीद्र रेषेखालील असेल तरी चालेल, परंतु गटातील कोणत्याही अर्जदाराने कोणत्याही योजने अंतर्गत लाभ घेतलेला नसावा तरच गट या योजनेअंतर्गत लाभ घेण्यास पात्र राहील. (७) ज्या संस्था सोसायटी ॲक्ट १९६० नुसार नोंदणी झालेल्या आहे तसेच चॅरीटेबल ट्रस्ट अंतर्गत नोंदणी झालेल्या संस्था सुध्दा या योजनेअंतर्गत लाभ घेण्यास पात्र राहील. (८) केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही योजनेअंतर्गत लाभ घेतलेला नसावा तसेच सुरु असलेला उद्योग, सेवा उद्योग या योजनेअंतर्गत पात्र राहणार नाही. (९) कर्ज प्रकरण दोन प्रतित असावे ( एक मुळ प्रत व एक झेरॉक्स) (१०) नकारार्थी सुचीतील घटक/व्यवसाय/सेवा व्यवसायाकरीता असलेले अर्ज अपात्र राहतील. (११) सदर योजने अंतर्गत एका लाखाच्या स्थीर गुंतवणूकीला कमीत कमी एक रोजगार निर्मिती होणे आवश्यक राहील. (१२) पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत वित्तीय संस्था, (अनुदान) व स्वतःचे भांडवलाबाबतची पध्दती खालीलप्रमाणे विहीत करण्यांत आलेली आहे.

(२)

| अनु.क्र. | वर्गवारी | लाभार्थीचे स्वतःचे भांडवल | अनुदानाचे दर | |
|---|---|---|---|---|
| | | | शहरी | ग्रामीण |
| १. | सर्वसाधारण | १०% | १५% | २५% |
| २. | अनुसूचित जाती/ जमाती/ इतर मागासवर्गीय/ अल्पसंख्यांक/ स्त्री लाभार्थी/ माजी सैनिक, अपंग/नेर हिल अॅड बॉर्डर एरीया | ५% | २५% | ३५% |

**<u>अर्जासोबत लागणारी कागदपत्रे</u> :- (दोन प्रतित)**

शैक्षणिक पात्रता : मार्कलिस्ट/प्रमाणपत्र (२) शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला/जन्म तारखेचा दाखला (३) जातीचे, अपंगत्वाचे/माजी सैनिक प्रमाणपत्र (४) राहत्या घराचा पुरावा उदा.इलेक्ट्रीक बील/कर पावती/टेलीफोन बील/निवडणूक ओळखपत्र (५) पासपोर्ट फोटो २ (६) बांधकामासाठी कर्ज मागणी असल्यास जागेच्या मालकी हक्काचा दाखला आणि मंजूर झालेला बांधकाम नकाशा/ बांधकामाचे एस्टीमेट/ ७/१२ चा उतारा/ नमुना ८अ चा उतारा (७) नगरपालीका/ग्रामपंचायतीचे ना हरकत प्रमाणपत्र (८) यंत्रसामुग्री, हत्यारे, औजारे, फर्निचर इत्यादीचे दरपत्रक (कोटेशन) (९) संक्षिप्त प्रकल्प अहवाल. (१०) उद्योग/सेवाउद्योग/व्यवसाय ची जागा भाडयाची असल्यास जागा मालकाचे संमतीपत्र.

यवतमाळ तालुक्यातील अर्ज जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयात कामकाजाचे दिवशी सिग्मा कक्षात स्विकारले जातील.

*******